**शाळास्तरावर मासिक पाळी व्यवस्थापन (Menstrual hygiene Management) व स्वच्छतेच्या सवयीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण२०१७/प्र.क.(१४७/१७)/एसडी-६**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२
दिनांक :- २७ ऑक्टोबर, २०१७.

**वाचा- १) स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय, राष्ट्रीय अभियानाची सप्टेंबर, २०१४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली मार्गदर्शिका.**
**२) संचालक, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) यांनी डिसेंबर, २०१४ मध्ये प्रसिद्ध केलेली स्वच्छ भारत मिशन (ग्रा) मार्गदर्शिका.**
**३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांनी प्रसिद्ध केलेली मासिक पाळी व्यवस्थापन राज्य मार्गदर्शिका मे, २०१६.**
**४) प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुबई यांचे दि. २४ एप्रिल, २०१७ चे पत्र.**

**प्रस्तावना :**

मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी -स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय॰ हे राष्ट्रीय अभियान सप्टेंबर, २०१४ पासून सुरु केले आहे. यानुसार देशातील प्रत्येक शाळेत पिण्याचे पाणी, मुला मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, हात धुण्याची सुविधा, अपंगांसाठी स्वच्छतागृहांची विशेष सुविधा उपलब्ध असणे व त्यासाठी क्षमता बांधणी व देखभाल दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

याच अभियानाचा एक अविभाज्य भाग म्हणून मासिक पाळी व्यवस्थापनाकडे देखील लक्ष वेधलेले आहे. शाळेत येणाऱ्या किशोरवयीन मुलींची कोणत्याही प्रकारे कुचंबना होऊ नये व त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी मासिक पाळी व्यवस्थापन हा विषय महत्त्वाचा आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या (२००९) अहवालानुसार १२ टक्के मुली या मासिक पाळीच्या दरम्यान शाळेत अनुपस्थित राहातात. भारतासारख्या विविध रुढी परंपरांना मानणाऱ्या देशात मासिक पाळी या विषयावर पुरुषांशी बोलणे तर दूरच, महिला महिलांशीही चर्चा करणे टाळतात. या विषयाबाबत अनेक समज- गैरसमज असल्याने मासिक पाळी या विषयावर चर्चा करणे, हे अयोग्य मानले जाते. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात युनिसेफने केलेल्या एका सर्वेक्षणात असे आढळून आले की, ११ ते १९ वर्षे वयोगटातील केवळ १३ टक्के मुलींना पहिली पाळी येण्याअगोदर पाळी बाबत माहिती होती. आणि ६० ते ७० टक्के किशोरवयीन मुली पाळीच्या दरम्यान शाळेत जात नाहीत. अशा परिस्थितीत शाळकरी मुलींना जर वेळीच योग्य शिक्षण व मार्गदर्शन मिळाले तर निश्चितच या परिस्थितीत बदल होईल, हे लक्षात घेऊन स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय मिशनमध्ये या विषयाचा आवर्जून उल्लेख केलेला आहे. ज्या शाळेत किशोरवयीन मुली शिकत आहेत त्या शाळेत मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा, पुरेशा प्रमाणात शोषकांची (absorbent- सॅनिटरी पॅड, सुती कापड आदी ) उपलब्धता, त्यांची विल्हेवाट लावण्याची सुविधा (Incinerator) व योग्य असे मार्गदर्शन, असे या मासिक पाळी व्यवस्थापनाचे मुख्य घटक आहेत.

**शासन परिपत्रक :**

**मासिक पाळी व्यवस्थापन कार्यक्रम (Menstrual hygiene Management):**

स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय अभियानाचा भाग म्हणून राज्यातील सर्व उच्च प्राथमिक व त्यावरील शाळांमध्ये मासिक पाळी व्यवस्थापन कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. राज्यातील जालना, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, औरंगाबाद, अहमदनगर या जिल्ह्यात युनिसेफच्या तांत्रिक सहाय्याने मासिक पाळी व्यवस्थापन उपक्रम राबविण्यात आला आहे. त्याचा अनुभव पाहाता हा उपक्रम शाळा पातळीवर राबविणे शक्य आहे. उपरोक्त सात जिल्ह्यात हा उपक्रम राबविताना महिला व बालकल्याण, आरोग्य, शिक्षण विभाग व पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचा समन्वय साधण्यात आला. त्यामुळे या उपक्रमाद्वारे केवळ शाळकरी मुलीच नाही, तर अन्य मुलीं व महिलांनाही मार्गदर्शन होत आहे. त्याचा प्रत्यक्ष लाभ शाळेत शिकणाऱ्या किशोरवयीन मुलींना होत आहे.

**स्वच्छ विद्यालय स्वच्छ महाराष्ट्र टास्क फोर्स :**

मा. आयुक्त (शिक्षण) यांनी दिनांक ३१ मार्च, २०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांप्रमाणे स्वच्छ विद्यालय व MHM या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे स्वच्छ विद्यालय, स्वच्छ महाराष्ट्र टास्क फोर्स स्थापन करण्यात यावा. टास्क फोर्सची रचना पुढीलप्रमाणे राहील.

१. महापालिका क्षेत्रासाठी आयुक्त,महानगरपालिका हे अध्यक्ष राहतील.
२. जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हे अध्यक्ष राहतील.
३. नगरपालिका क्षेत्रासाठी मुख्यधिकारी, नगरपालिका हे अध्यक्ष राहतील.
४. सदर टास्क फोर्स मध्ये इतर सदस्य पुढीलप्रमाणे राहतील.
   - शिक्षणाधिकारी (माध्यमिक) - सदस्य
   - कार्यकारी अभियंता- सर्व शिक्षा अभियान - सदस्य
   - लिंग समभाव समन्वयक - सदस्य
   - एक क्रियाशील शिक्षक (पुरुष) - सदस्य
   - एक क्रियाशील शिक्षक (महिला) - सदस्य
   - शिक्षणाधिकारी (प्राथमिक) टास्कफोर्स प्रमुख - सदस्य सचिव

तसेच याव्यतिरिक्त प्राचार्य DIECPD, महिला व बालकल्याण विभागातील पर्यवेक्षक (ICDS-Supervisor) व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन (शालेय स्वच्छता तज्ञ) यांनाही टास्कफोर्सच्या बैठकांना आमंत्रित करण्यात यावे.

या क्षेत्रात कार्यरत अन्य संस्था / व्यक्ती यांना आंमत्रित करण्याचे अधिकार आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्याधिकारी यांना राहतील. ही निवड करताना अभ्यासू, स्वेच्छेने तयार असलेल्या व ज्यांनी याआधी मासिक पाळी व्यवस्थापन विषयी प्रशिक्षण घेतलेले असेल त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

**टास्क फोर्स ची भूमिका :**

टास्क फोर्स ने जिल्ह्यातील मासिक पाळी व्यवस्थापन उपक्रमाची संपूर्ण अंमलबजावणी व त्याचे संनियंत्रण, या अत्यंत महत्वाच्या जबाबदाऱ्याही पार पाडायच्या आहेत. त्याचे प्रमुख तीन घटक पुढीलप्रमाणे

१) मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षणाच्या दर्जात कोणतीही तडजोड होत नाही याची खात्री करणे.
२) या उपक्रमाचा आढावा घेणे व त्याबाबत शासनाला अहवाल देणे.
३) झालेल्या उपक्रमांचे अहवाल तयार करणे व आवश्यक त्या दुरुस्ती सुचविणे.

**राज्यस्तरीय प्रशिक्षण :**

युनिसेफ व महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांच्याकडून जिल्हास्तरावर निवड झालेल्या टास्क फोर्सने नामनिर्देशित केलेल्या संस्थांच्या महिला प्रतिनिधी/महिला अधिकारी/टास्क फोर्स सदस्यांचे राज्यस्तरावर प्रशिक्षण घेतले जाणार आहे. यासाठी युनिसेफ यांच्याकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीने नामनिर्देशित सदस्यांची / अधिकाऱ्यांची माहिती महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांना कळवावी.

**जिल्हा व तालुकास्तर प्रशिक्षण** :

राज्यस्तर प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षित मास्टर ट्रेनर्सच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व शाळांतील महिला शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात यावे. त्याचे नियोजन जिल्ह्याने करावयाचे आहे. मात्र हे प्रशिक्षण सुरु करण्यापूर्वी जिल्ह्यात हा उपक्रम राबविण्याबातचा नियोजन आराखडा तयार करणे आवश्यक आहे. यासाठी युनिसेफचे सहकार्य घेता येईल. शाळास्तरावर हा उपक्रम राबविण्याकरिता याबाबतचे वेळापत्रक तयार करुन, त्यानुसार हा उपक्रम राबवावयाचा आहे. प्रशिक्षणासाठी येणारा खर्च संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपलब्ध निधीतून भागवावा.

युनिसेफतर्फे मासिक पाळी व्यवस्थापनांतर्गत सहा सत्रे तयार करण्यात आली असून, दर महिन्याला एक सत्र या प्रमाणे सहा महिन्यांत सहा सत्रे घ्यावयाची आहेत. ती ६ सत्रे पुढील प्रमाणे -

सत्र १) मासिक पाळी विषयी समज निर्माण करणे.
सत्र २) मासिक पाळी दरम्यान उद्भवलेल्या आव्हानांना हाताळणे.
सत्र ३) मासिक पाळीच्या दिवसांत पाळावयाची स्वच्छता व आरोग्य.
सत्र ४) शोषके योग्य पद्धतीने हाताळणे.
सत्र ५) मासिक पाळी हा विषय साधारण बनविणे व अंधश्रद्धा व गैरसमजूती दूर करणे.
सत्र ६) मी, सल्लागार.

तसेच युनिसेफ तर्फे तयार करण्यात आलेली विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतेची १२ सत्रे (या विभागाचे दि.१४ ऑक्टोंबर, २०१६ चे परिपत्रक) यांचा सुध्दा वरील प्रशिक्षणात समावेश करण्यात यावा.

युनिसेफने सदरची सत्रे बनविलेली असून, ठाणे, जालना आदी जिल्ह्यात यानुषंगिक उपक्रम राबविण्यात आला आहे व त्याचे चांगले परिणामही दिसून येत आहेत. हा उपक्रम प्रामुख्याने वर्तन बदलाशी संबंधित आहे व वर्तन बदलासाठी सातत्याने पाठपुरावा आवश्यक आहे.

सदरहू सहा सत्रांच्या प्रती महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे मार्फत प्रशिक्षणावेळी उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत १,००० प्रगत शाळांमधून स्वच्छतेच्या सवयी रुजविणे या उद्देशाने प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

**समन्वयाची गरज :** हा उपक्रम राबविताना जिल्ह्यातील विविध विभागांमध्ये टास्कफोर्स तर्फे बैठका घेवून उपक्रमांचा आढावा घेणे, उपक्रमासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देणे व त्यांचे संनियंत्रण करणे ही कार्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पार पाडावी.

**शाळेतील सुविधा :**

प्रशिक्षणाच्या माध्यमातून मुलींना मासिक पाळी व्यवस्थापन कसे करावे याबाबतचे मार्गदर्शन केले जाईल. मात्र त्यासाठी शाळेत सुविधा उपलब्ध नसतील तर त्याचा काहीच उपयोग होणार नाही. यासाठी प्रत्येक शाळेत मुलींसाठी स्वतंत्र शौचालय असणे आवश्यक आहे. ते स्वच्छ असावे, त्यात मुलींना कपडे बदलता येतील अशी व्यवस्था असावी, आरसा असावा, वापरलेली शोषके टाकण्यासाठी पेपर व कचराकुंडी असावी, शिवाय मुलींच्या शौचालयात हुक असावेत, तसेच हात धुण्यासाठी पाणी व साबण उपलब्ध असावा. काही शाळांनी वापरलेली शोषके नष्ट करण्यासाठी Incinerator बसविलेले आहेत, तसे बसविल्यास उत्तमच परंतु तशी व्यवस्था करणे शक्य नसेल तर वापरलेल्या शोषकांची विल्हेवाट लावण्यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी.

**पालकांशी चर्चा :**

केवळ शाळेत व्यवस्थापन करणे आवश्यक नसून मुलींच्या घरीही याबाबत जागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक सभांच्या माध्यमातून तसेच पालक संपर्कांच्या माध्यमातून पालकांशीही याबाबत चर्चा व मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. शाळेत असलेल्या मीना राजू मंच, किशोरी मंच यांनाही या कार्यात सहभागी करुन घ्यावे.

शाळेत मासिक पाळी व्यवस्थापनाची सुविधा नाही म्हणून कोणतीही मुलगी गैरहजर राहणे हे सुशिक्षित समाजाला शोभणारे नाही. त्यामुळे अशी एकही मुलगी गैरहजर राहाणार नाही व तिचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, यासाठी कार्य करणे महत्वाचे आहे.

उपरोक्तप्रमाणे शाळास्तरावर मासिक पाळी व्यवस्थापन (Menstrual hygiene Management) उपक्रम राबविणेबाबतचे आदेश, सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आणावेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१०३०१५५२३९९१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat
Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2017.10.30 15:39:59 +05'30'

**(डॉ.सुवर्णा खरात)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत, माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. विरोधी पक्ष नेता, (विधान सभा/ विधान परिषद), विधानभवन, मुंबई.
३. सर्व मा. विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
४. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा. प्रधान सचिव, पाणीपुवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मा. प्रधान सचिव, नगर विकास(२) विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. मा. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. मा. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. मा. सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा.
१४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१५. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे यांचे विशेष कार्य अधिकारी, मुंबई.
१६. संचालक, विद्या प्रधिकरण, पुणे.
१७. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, पुणे .
१८. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९. शिक्षण संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, पुणे
२०. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
२१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२२. शिक्षण अधिकारी (माध्यमिक, प्राथमिक, निरंतर) (सर्व)
२३. शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई.
२४. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
२५. राज्य सल्लागार, युनिसेफ.
२६. निवड नस्ती, एसडी-६.